


मुद्गल-नऱ्हेकर-नांदोशीकर-देशपांडे
घराण्यांतील छत्रपती शिवाजी कालखंडांतील




ऐतिहासिक कागदपत्रे

संपादकः राजाराम देशपांडे












दार उघड बया आता दार उघड









लेखकाचा परिचय



राजाराम शंकर देशपांडे
चार्टर्ड इंजिनिअर
एम्.आय्.ई.सी.ई., एम्.एस्.ई (१)

१९५९ ला कॉलेज् ऑफ इजिंनियरींग पुणे, इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्स, कोलकत्ता व मिलिटरी इंजिंनियरींग कॉलेज्, खडकी येथे पदवी. बाँब डिस्पोजल तंत्रज्ञान. यशवंतराव चव्हाण प्रबोधिनी, पुणे व मेरी नाशिक-प्रशिक्षणाधिकारी, ३६ वर्षे सरकारी नोकरी त्यानंतर वडिलोपार्जित शेती व्यवसाय. "वनश्री" पुरस्कारासाठी नामनिर्देशन.

प्रतिनियुक्ती- वैकुंठ मेहता राष्ट्रीय सहकारी प्रबंध संस्थान पुणे. पुणे विद्यापीठ, जिल्हा- उपनिबंधक, सहकारी संस्था व जिल्हा परिषद- पुणे व सातारा, डिझाईन्स सर्कल- मुंबई.

पत्ता:
आदिती, प्लॉट नं ८,
भरतकुंज वसाहत नं २,
एरंडवणा, गणेश नगर,
पुणे: ४११०३८
दुरध्वनी: २५४४११७८
मोबा: ९४२०६९६४३२

मुद्गल – नऱ्हेकर – नांदोशीकर – देशपांडे (पाटील)
या घराण्याचा ... छत्रपति शिवाजी महाराजांच्या कालखंडातील

ऐतिहासिक कागदपत्रे

(इ. स. १६३० ते इ. स. १६८०)

लेखक व प्रकाशक :

श्री. राजाराम शंकर देशपांडे
अेम्. आय्. ई. सी. ई.
अेम्. अेस्. ई. (१) चार्टर्ड इंजिनियर

मूल्य : रु. ८००/-

प्रोफिशन्ट™
पब्लिशिंग हाऊस

लेखक व प्रकाशक : राजाराम शंकर देशपांडे
एम्. आय्. ई. सी. ई., एम्. एस्. ई. (१) चार्टर्ड इंजिनियर
पत्ता : ''आदिती,'' प्लॉट नं. ८,
भरतकुंज वसाहत नं. २, अेरंडवणा (गणेशनगर),
पुणे ४११०३८.
फोन : ०२० - २५४४११७८, ९४२०६९६४३२

प्रथमावृत्ती : दिनांक १४ मार्च २०१०


अक्षर-जुळणी : स्वाती एन्टरप्राईजेस, पुणे - ९
अर्क डिझाईन, पुणे.

मुखपृष्ठ, मलपृष्ठ व आतील चित्रे
शंकर गोजारे, संदीप साळुंके, अमोल क्षीरसागर, शशांक गुप्ते

प्रकाशन सहाय्य व वितरक :
अ. र. नांदुरकर
अनमोल डिस्ट्रिब्यूटर्स
५३५, शनिवार पेठ, शॉप नं. ९, राधाकृष्ण बिल्डिंग ;
प्रभात सिनेमा समोर, पुणे - ४११०३०.
फोन : ०२० - २४४८४५३८.

मुद्रक : अभिषेक क्रियेशन्स
९८७, सदाशिव पेठ, पुणे-४११ ०३०.

अनुक्रमणिका


INAM
A
COMMISSION
54 | 10 | 58

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

54	10	59

[illegible]

श्री

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

54	10	8

[illegible]

54 | 10 | 6?

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible] R 54 | 10 | 63 [illegible]

[illegible] [illegible]

१ [illegible]	९ [illegible]
२ [illegible]	१० [illegible]
३ [illegible]	११ [illegible]
४ [illegible]	१२ [illegible]
५ [illegible]	१३ [illegible]
६ [illegible]	१४ [illegible]
७ [illegible]	१५ [illegible]
८ [illegible]	१६ [illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

54	10	45

[illegible]

R.54 | 10 | 66

INAM A COMMISSIONER

पुणे पुराभिलेखागार, पुणे
महाराष्ट्र शासन

[illegible]

अभिलेखाधिकारी,
पुणे पुराभिलेखागार, पुणे.

1

B 54	10	67

2


3


1

[illegible]


R 54 | 10 | 66

[illegible]





अभिलेखाधिकारी.
पुणे पुरालेखागार, पुणे.


B 54 | 10 | 85
INAM
A

[illegible]

[illegible]

B 54	10	86

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

54 | 10 | 87

३ [illegible]

54 | 10 | 44

[illegible]

१ [illegible]

INAM A COMMISSION

१ [illegible]

१ [illegible]

३

१ [illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

54 | 10 | 84

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

B 54 | 10 | 90

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible] on the 19th
November 1852

[illegible signature]

54 | 10 | 96

[illegible]

INAM A COMMISSION


[illegible]

[illegible] 19[illegible]

[illegible]

अभिलेखाधिकारी,
पुणे पुरालेखागार, पुणे.

INAM A COMMISSION


श्री
INAM
A
COMMISSION
B 54 10 ९६

[illegible]

[illegible]

[illegible]

INAM A COMMISSION

54	10	98

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

Godge

अभिलेखाधिकारी,
पुणे पुराभिलेखागार, पुणे.

श्री

54	10	११

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]


[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

B 54 | 10 | 100


54 | 10 | 101

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

54	10	103

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

54	10	105

[illegible]

[illegible] [illegible]

[illegible] ३८

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]


[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]


INAM A COMMISSION
R 54 10 106
अभिलेखाधिकारी.
पुणे पुराभिलेखागार, पुणे.

[illegible]

[illegible]

54	10	107

[illegible]

[illegible]

[illegible]

६२

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

54	16	108

[illegible]

[illegible]

[illegible]


[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]


54 | 10 | 109

अभिलेखाधिकारी,
पुणे पुराभिलेखागार, पुणे.

54	10/3	110

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

१ [illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

B 54 | 10 | 1!!

२ [illegible]

[illegible]

B 54 | 10 | 112

[illegible]
१८

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

54	10	113

[illegible]

[illegible]

५४ | १० | १४५


[illegible]

[illegible]

१ [illegible]

[illegible]

१ [illegible]



खेड शिवापूर येथील न्हेकर देशपांडे यांचे इनाम जमिनीबद्दल वंशावल वगैरे माहिती

श्री

इनाम	१४३२
ए	९४२२३
कमिशन	

राजश्री निंबाजी बांडे हवालदार निजाशाह बाग कसबे खेड शिवापूर तर्फ खेडेबारे गोसावीयास -

अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य राजश्री श्री मनोहरगीर किल्ले सिंहगड व कमाविसदार कते मजकूर इसने अशर मया तेन व अलफे (इ. स. १८१२) राजश्री जनार्दन नारायण देशपांडे त. मजकूर यांनी पुण्याचे मुक्कामी विदित केले की कसबे मजकूरी आपले वतनी घर करणे आहे. त्या खेरीज नूतन जागा घर बांधावयास व परसू बागायत नेमून दिल्यास त्या जागेत घर बांधून परसांत बागाईत करून वंशपरंपरेने जाऊ म्हणोन त्याजवरून तपे मजकूरची नव्वद टक्के जमीन गांवाचे वसाहतीची त्यापैकी खोलेश्वरनजिक जमीन सव्वा दोन बिघा आहे. त्यावर वसाहत नाही. याजमुळे लगे मजकूरचे शहाबागकडे लावणी करून थळझाडे व साराही जमेस येत होता. तो वंशपरंपरेने माफ करून जिल्हेस घर बांधवयास व परसांत मन मानेल तसे घर-जित्रस बागाईत करावयास जमीन जेथून दिल्ही त्याची मोजणी लांबी

दक्षिणोत्तर	पूर्व पश्चिम
२७ पूर्वेचे अंगे दक्षिणोत्तर काठ्या सुमार	१४ दक्षिण अंगे पूर्व पश्चिम
२२ मध्य	१५
२० पश्चिम अंगे दक्षिणोत्तर	१५ उत्तरेकडे पूर्व पश्चिम
६९	४४
पैकी तीजाई काठ्या २३	१५ तिजाई काठ्या
अेकूथ गुणाकार शिव	३४६
दर बिघा प्रमाणे ४००	बिघे ८।।। -।.

यांसी चतुःसीमा -

१. पूर्वेचे अंगे शापूरवाज वलद महंमदरशाह वळद नबीशा मुजावर याचे घरामागे पश्चिमेस पस्सू आहे. त्याचे बांधास आंब्याची झाडे मुजावर याने लाविली आहेत व बांधावर कुडण आहे त्या बांधाची हद्द.

१. पश्चिमेस उत्तर दक्षिण जनार्दन नारायण देशपांडे तर्फ मजकूर यास रघुनाथ त्र्यंबक देव यांनी आपले घर वाणियाची जागा दरोबस्त दिली आहे. त्याचे पुढे वागजाई देव आहे. थोनजी वाजी बिन गोदाजी व राणोजी बिन डोग्राजी गुख याचे घराचे पाठी मागील परसाचा बांध आहे. त्या बांधाची हद्द.

१. उत्तर दक्षिणेचे अंगे सरकार बागांतील थडे-पटीची जमीन आहे. त्याचे शेजारी श्री खोलेश्वर देव आहे. त्याचे दक्षिणेस बांधानजिक पाण्याचा पाट पूर्व पश्चिम जात आहे. त्या बांधाची हद

१ दक्षिणेस नारोपंत भावे याच्या घराची भिंत पूर्व पश्चिम त्याची हद

४

सदरहू जमिनीत झाडे आंब्याची खोलेश्वरानाजिक ३, बोर, ५ जांभळीचे रोथा १, भोकर १ येणेप्रमाणे चतुःसीमापूर्वक जमीन पाऊण बिधा सव्वा दोन पांड व त्या जमिनीत अेकण दहा झाडे सुद्धा घर बांधावयास व बाग करावयास पुत्रपौत्रादि वंशपरंपरेने व सारा माफीने दिली आहे. या पत्राची प्रति लेहून घेऊन हे अस्सल पत्र भोगवटीयास परतोन देणे जाणिजे १४३२

(२) ११७७, इनाम कमिशन आय्, १४३२ सीमा नक्कल

आज्ञापर समस्त धुरंधर रा राजश्री माधवराव पंडीत प्रधान तर्फ मोकदम कसबे शिवापूर त. खेडेबारे सुभा समान सीतेन मथा व अलफ शके १६८९ (इ.स.१७६८) सर्वाजित संवत्सरे राजश्री कासी रामचंद्र उपनाम नऱ्हेकर, गोत्र अत्रि आर्य सूत्र आश्वलायन कसबे पुणे येथील मुक्कामी येऊन विनंती केली की आपण कुटुंबवत्सल, योगक्षेमा साठी स्वामीनी कृपाळू होऊन काही नूतन जमीन पाटस्थळ ईनाम करार करून देऊन चालबिली पाहिजे. म्हणोन यास काष्ठ, पाषाण, निधिनिक्षेपसहित करार करून सनद सादर केली. याचे हुकुम करून घेऊन यास व याचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेने इनाम चालविणे. या सनदेची नक्कल लिहून घेऊन हे सनदपत्र भोगवटीस परतोन देणे.

छ-२१ अग्रज्ञापत्र जाणे मोर्तब १४३२

(३) श्री

राजाराम नरपती ... ४६८७

हर्षनिधान माध

वराव मुख्यप्रधान

आज्ञापत्र राजश्री पंतप्रधान त ।। मोकदम कते शिवापूर सूमा सन इहिदे मया व अलफे (इ. स. १७७१) शके १६९२ कते मजकूर येथील कमाविसदार राजश्री शिवराम रघुनाथ याजकडे होती. ते दूर करून राजश्री कृष्णाजी विश्वनाथ यास कमाविसी सांगितले असे तरी मजकूर निमेसी रूजूं होऊन कते मजकूर येथील वसूल देणे जाणिजे.

छ ९ ४६८७

(४) श्री

आज्ञापत्र समस्त रा. धुरंधर विश्वासानिधी राजमान्य राजश्री माधवराव पंडित त ।। मोकदम, कसबे खेड शिवापूर, त ।। खेडेबारे सुरू सन सर्बेन मया व अलफ शके १६९१ (इ.स.१७६९) प्रमाथी नाम संवत्सरे र ।। हरि जिवाजी बर्वे यासी हुजुर पुण्याचे मुक्कामी विनंती केली की सरकार बागेची बेलाची जागा आहे. त्यांत बेल राहत नाही. यास्तव ती जागा आपल्यास रहाण्यास बक्षीस दिली पाहिजे म्हणून किल्ले मजकूर सरकार जागेची मोजणीनुसार लांबी पाऊणशे हात व रुंदी साठ हात अशी जागा रहाण्यास बक्षीस दिली आहे. तरी सदर जागेचा चकनामा करून हुकुमनाम्याप्रमाणे कारवाई करणे. या जागेची प्रति लिहून घेऊन ही अस्सल सनद मजकूर जिल्हेस भोगवयास परतून देणे जाणिजे छ १८ आज्ञप्रमाणे मोर्तब असे ४६८७

(५) सादिलवार कसबे खेड शिवापूर रा मनोहरगीर ... ग्रामदेव कसबे खेड येथील नांवनिशीवार देवस्थाने, इनाम कमिशन (डी), खालीलप्रमाणे नं ४६८७. १ श्री गणपती; श्री जावजी १; वेताळ २; मुंजे ३; सामजाई वडजाई १; केतकाई

१; तळजाई १; नागझरीजवळील म्हसोबा ५; वलजाई १; मागजाई १; ..... अेकूण १७ हनुमंत २ भैरव १ खडजाई १; जोगाई १; मावळमाची १; वडजाई १; अेकूण ८; अेकूण २५ संख्या

पूजा व नैवेद्यास कसबे खेड येथे अैनजिनसी ८=।। ..... छ -२८ रजब १।-।।

(६) कते खेड शिवापूर ता।। खेडेबारे पेठ डोणजे ता।। हवेली, जिल्हा-पुणे इनाम कमिशन - ए बी ५४-१०-२७.

जामीन कदीम		अेकर	अेकूण	ज्याचे नांव दाखल आहे तो	सरकारास द्यावयांचे दरसाल
पुणे यांजकडून जा. नंबर २२१ ता. २२।१०।१८५२ दरोबस्त जमीन शके ६१।।।. लिहिला आहे.	प्रत बंदी क्षमी नाही.	प्रत बंदी क्षमी नाही.	१७३८१५८११	गोपाळ अनंत व त्रिंबक बल्लाह उर्फ जनार्दन नारायण वगैरे भाऊनिम देशपांडे	१३८१४

सदरहू वहिवाटदारापैकी गोपाळ अनंत देशपांडे .... यांसी कैफियत घेणे की ...... स।। ता ८।११।१८५२ इसवी

१ आमचे नाव गोपालपंत बापाचे नांव अनंतराव आज्याचे नांव नारोपंत आडनांव न्हेकर जात देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण उमर वर्षे ६०.

२ आमचा जन्म पेठ डोणजे, तालुका हवेली, जिल्हा पुणे राहणार खेड शिवापूर

३ कसबे खेड शिवापूर येथे देशपांडे पणाचे चाकरीबद्दल मापाप्रमाणे ६१।।। बिडे ५५ ।।।. (बी ५४-१०-२८)

टक्के ईनाम जामीन चालत आली आहे.

४ सदरहू इनाम जमिन वंशपरंपरा असून दरसाल इनाम तिजाईबद्दल १३८१४ चा आकार असून दरसाल निम्मे आम्हांस द्यावे. लागतात.

५ ज्या वेळेस जमिन मिळाली त्यावेळेस जिरायत होती. पुढे आमच्या पूर्वजांनी अजमासे शंभर वर्षाचे पलीकडे कांही जमीन बागाईती करून त्यांत १०० आंब्याची झाडे लाविली आहेत.

६ सदरहू जमीन सरकार खालसांतून पादशहांनी ईनाम करून दिल्ही.

७ कोणी जमीन पूर्वी कसली हे आम्हांस ठाऊक नाही. परंतु अंदाजे २०० वर्षाहून अधिक काळ इनाम आमचेकडे होते असे जबावांत दिले, त्याजवरून आम्हांस माहिती आहे. (बी-५४-१०-२९)

८ सदरहू जामिनीचा मूळ संपादक राधो. आज त्याचे नांव रघोपंत हे होते ते आमचे पासून तेरावे पिढीचे पूर्वज होते.

९ सदरहू जमीन व ते खेड शिवापूर येथील देशपांडेपणाची म्हणून चाकरी पोटी मिळाली असून त्याप्रमाणे काम आम्ही करीत आहोत.

१० सन १२२१ फसली साली सदरहू जमिनीची वहिवाट जनार्दन नारायण हे करित होते ते मूळ संपादकाचे धाकटे भावाचे पुढील चौदावे पिढीचे वंशज होते व आम्हांस तेरावे पिढीचे भाऊबंद होते.

११ सदरहू वहिवाटदार यांनी सन १२४५ फसली पर्यन्त जामिनीची वहिवाट पुढे सदहूर जमिनीत आमचा निम्मा हिस्सा आहे असे म्हणोन आम्ही कंपनी सरकारांत फिर्याद केली होती. त्याची चौकशी होऊन सन १२४८ फसली साली सरकारकडून निम्मे जामिनीची मालकी आली तेथपासून आम्ही वहिवाट आजपर्यन्त करित आहोत.

१२ सदहूर जमिन इनाम मिळल्यापासून शके १६१९ ते सन ११६७ फसली पर्यन्त वहीवाट चालत आली. नंतर सदहूर साली भाऊबंदकीमुळे नाना साहेब पेशवे यांनी ती जामिन जप्त केली ती शके १६९० म्हणोन सन ११७८ फसली साली. पेशवे सरकारांत जनार्दन नारायण याचे मुलांनी अर्ज केल्या वरून शिवराय बापूजी पेशवे याचे भिडेने सदहूर साली जामीन त्याचे ताब्यांत दिली. ती शके १७०१ म्हणजे सन ११९८ फसली पर्यन्त सरकारकडून जप्तीच होती. नंतर सदरहू साली जनार्दन नारायण यांनी पेशवे सरकारांत इन्साफ न होतां ती जामीन आपले वहिवाटीस घेतली.

१३ ज्या दिवशी कंपनी सरकारचा अंमल सुरू झाला तेव्हापासून सन १२४५ पर्यन्त जप्ती वगैरे दिकत कांही झाली नाही. सन १२४६ फसलीस आमचे अर्जावरून कंपनी सरकारांतून जप्ती झाली होती ती सन १२४७ फसली साली मोकलीक झाली. याशिवाय जप्ती वगैरे दिकत काही महिने बिनदिक्कत चालोन आहे.

१४ सदहूर जामीन पोट इनाम म्हणून कोणास कांही दिली नाही.

१५ जामिनीची लावणी दुसरे रयतेस याचे उत्तर नकलेत आहे. उत्पन्न व नक्त नूमणूक त्याबद्दल जमाखर्च बितपसील: -

जमा	रूपये	खर्च	रूपये
३५	सदहूर जमिनीची लागवड वजा जातो दरसाल उत्पन्न अंदाजे होते ते ७०/- प्रमाणे निम्मे अदमासे झाडासुद्धां	६८१५	इनाम तिजाई खत दरसाल द्यावे लागतात प्र. निम्मे १३८१४
५०	पेठ डोणजे, ता।। हवेली, पुणे जिल्हा येथील खालसा गांव १० दुमाले गांव ६ कते खेड शिवापूर येथील पेठ सुद्धां नक्त नेमणूक दरसाल नक्त नेमणूक मिळतात ते प्रमाण निम्मे १००/-	७८	महालकरी पेठ डोणजे, तालुका. हवेली, जिल्हा-पुणे याचे कचेरीत देशपांडेपणाचे २ कुलकर्णी हिश्यांचे चाकरी करितां दोन करून दिल्हे आहेत. त्यास रोजमुद्रा द्यावा लागतो त्याजबाबत होतात ते असे रु. (बी - ५४ - १० - ३३)
८५		८५	

येणे प्रमाणे खर्च होत आहे त्यांत आम्हांस काही रहात नाही. १६० सदरहू पंधरा कलमाचा मजकूर करार. आम्हांस सनदपत्र हजर केले ते:-

१ राजा शिवछत्रपती याणी राज शक ४९ म्हणजे १२३२ फसलीची रूद्राजी सदाशिव पांडुरंगराव यांचे नांवे सनद अस्सल एक

१ विनायक बल्लाळ साठे महीकर पेठ डोणजे व ।। हवेली जिल्हा-पुणे यांनी सूजा समान समासीन मया तैन व अलफे सन १२४७ फसली ता।। ६ ऑक्टोबर सन १८३७ इसवीची ता।।. अस्सल एक

येणेप्रमाणे दोन कागद हजर केले आहेत. इतर कागद आमचेपाशी नाहीत. साक्षी पुरावा अर्ज द्यावयाचा नाही सदर सरकारी हिशोबास ६१।।।. टक्के इनाम जमीन व आमचे कडे ५५।।।. टक्के याप्रमाणे निम्मे म्हणजे लिहिले त्यासह सहा बिघा टक्के आमचे वाहिवाटीस आहे. याचा बितपशील सदरी लिहिला आहे.

(बी-५४-१०-३४)

येणेप्रमाणे सवालाचे जबाब इ.क ता १९।११।१८५२ इसवी. सही गोपाळ आनंद न्हेकर देशपांडे

सदरील वर लिहिलेला मजकूर आम्हांस कबूल आहे.

द. सु रामचंद्र गोविंद सही ××× त्रिंबक बल्लाळ न्हेकर देशपांडे तर्फे (बी ५४-१०-३५) खेडेबारे दस्तुर खुद्द.

इनाम कमिशन-ए सही ××× आभिलेखाधिकारी पुणे पुरालेखागार पुणे

७ इनाम कमिशन

वंशावल गोपाळ आनंद न्हेकर देशपांडे तर्फे खेडे बारे वस्ती-खेड शिवापूर, पेठ डोणजे, तालुका हवेली, जिल्हा पुणे यांनी कसबे मजकूर येथील निम्मे इनाम जमिनीची कैफियत लिहून दिली असून ही वंशावल संपादकाचे आज्यापासून लिहून दिली आहे.

तारीख १९ माहे नोव्हेंबर सन १८५२ इसवी दस्तुर खुद्द विसाजी पांडुरंग कास्कून तारीख मजकूर,

सही ××× त्रिंबक बल्लाल न्हेकर देशपांडे तर्फे खेडेबारे द.खु सही ××× इनाम कामिशर पुणे सही ××× अभिलेखाधिकारी, पुणे पुरालेखागार पुणे पुढील पानावर सविस्तर वंशवल दिली आहे.

८ बी ५४-१०-४४ "श्री" नक्कल इनाम कमिशन -ए

स्वस्ति श्री राज्यभिषेक शके ४९ शुभकृत संवत्सरे फाल्गुन शुद्ध सप्तमी यंदवासरे क्षत्रिय कुलावतंस श्री राजा शाहू छत्रपति स्वामी

यासि सखाजी व पांडुरंग
खंडोपंत उप नाम न्हेकर देशकुलकर्णी
ता. खेडेबारे व गांवकुलकर्णी निगा

न्हेकर त।। मजकूर यांस दिल्हे वतनपत्र अैसे जे

तुम्ही सातारा मुक्कामी स्वामी संन्निध विदित केले की त।। मजकूरचे देशकुलकर्ण गांवकुलकर्णचे वतन आपले वडिल राधो गोजोपंत यांनी वतन साधिले ते करीत होते. त्याउपरी त्याचे पुत्र रघो रघुनाथ यांनी केले. त्यांचा पुत्र राघो बागदेव वतन चालवित असतो वतनाचा कारभार बहुत आपणास असावे म्हणोन आप्पाजी रामचंद्र व मोरोबाकल याचे वडिल मुधाजी नरसिंह आपण एक असे समजोन राघो बागदेव यांनी देशकुलकर्णाचा निम्मे वाटा घेऊन कारभारास ठेविले. आपण वडिलपणाचा वांटा खाऊन होते. मुथाजी नरसिंह धाकुटपणाचा वाटा खाऊन धाकुटपणे वर्तोन कारभार चालवित होते. रूद्राजी नारायण आपले पणजे यापावितो सदहूर प्रमाणे चालत आले. त्याउपरि ते बलवाने सारे वतन त्याणी आपलेच आहे असे समजू लागले. मग आपले आजे **भिकाजीरूद्र** व चुलते **नारोभिकाजी** कसबा व पेठ शिवापूरचे देशकुलकर्णे व गावकुलकर्ण रूमाल **चिमणाजी बापूजी मोरोबाकल** याचा चुलता याणेहि रोज घेतला. पांच गांवाची कुलकर्णे मात्र आपणाकडे राहिली. हा प्रसंग थोरले कैलासवासी स्वामी पासी **सखो भिकाजी** याणी केला. तेव्हां चिमणाजी बापूजी याची भीड विशेष. याकरितां त।। हुजुर इनसाफ न झाला. मोरोबाकल याजवरी मनसूफी लावली. त्याणी चिमणाजी बापूजीचां पक्ष करून निर्वाह घेऊन दिल्हा हे वर्तमान मागती थोरले कैलासवासी स्वामीस निवेदन केले. त्याणी **सखो भिकाजी** यास आज्ञा केली की आर्धा **कसबाचे** व **पेठेचे** कुलकर्ण साधणे. उपरांतील देशकुलकर्ण हिस्साही तुजे तुज देतील अैसी. आज्ञा करून **चिमणाजी बापूजी** यास आज्ञापत्र दिल्हे. त्याप्रमाणे त्याणी **कसबाचे** व **पेठेचे** कुलकर्ण सोडून द्यावे. ते न दिल्हे फिरोन प्रसंग करावा **तरी अवघा घरबार त्यास अनुकुल.** **आपले न चाले.** त्यामुळे तसेच राहिले. कैलासवासी यांचे कारकिर्दीस प्रसंग व्हावा त्यास **चिमणाजी बापूजी** बदलोन मोगलाईत गेले होते. हजर नव्हते. याकरितां न जाले. अलिकडे कैलासवासी राजश्री काकासाहेब याचे कारकिर्दिस राजश्री शंकराजी पंतसचीव दशकास पत्र दिल्हे. दशकानी विनंतीपत्र लिहिले. देशकुलकर्ण व गांवकुलकर्णचे वतन पुरातन **नारो भिकाजी** व रूद्राजी सखाजी याचे वडिल हे धाकटे **बाळाजी बापूजी** परंतु यास रेटून तेच वतन खातात. अैसे लिहिले त्यावरून सचिवपंती त्र्यंबक शिवदेव याकडे पत्र घेऊन पाठविले. त्याणी इन्साफ करावा. तो कोरीगंतू फितूर जाले. त्यामुळे ते तिकडे गेले. इन्साफ

झाला नाही. त्या अलिकडे काही प्रसंग होऊन आलाच नाही. याऊपरी स्वामी परायणे आहेत. ईश्वर न्याये पारिपत्य केले पाहिजे म्हणोन विनंती केली. त्यावरून राजश्री पंडित सचिव यास आज्ञा करून "**आपाजी रामचंद**" व "मोरोबकल" यासी हुजुर आणविले त्यांसी वर्तमान सांगोन लिहून दिले. करीना दिला. मजकूरचे देशकुलकर्णाचे नकल झाले. आमचे वडिल **रूद्राजी सरबाजी** व पांडुरंग **खंडोरावचे** वडिल **राघो गोजदेव** यास वृत्ती दिली. त्यांनी मुधाजी नरसिंह यास निम्मा वांटा घेऊन कारभारास सामील करून घेतले कालगतीने मोरोबाकल यांचे वडिल बळावले. यामुळे **रूद्राजी सखाजी** व **पांडुरंग खंडोराव** यांचे वडिलांस रेटून वतन अनभवले.

आपाजी रामचंद्र व **मोरोबकल** यांनी तकरीर केली की रूद्राजी सखाजी व **पांडुरंग खंडोराव** हे आपले भाऊ खरे. वंशावली वरून मूळ पुरुष म्हणजे रघोपंत न्हेकर असून त्यास दोन पुत्र **गोजिपंत रघुनाथ** व मुधोजी रघुनाथ दोघांचे संतान येणेप्रमाणे (बी-५४-१०-५२)

थोरले गोजिपंत रघुनाथ यांचे संतान	**धाकटे मुधोजी रघुनाथ यांचे संतान**
१ राघोपंत	१ नरसोपंत
१ रघोपंत	१ मुधाजीपंत यास राघो बागदेव यांनी सामील करून घेतले
१ राघोपंत यांसी मुधाजी नस्ती यास निमे वांटा देऊन सामील वरून घेतले	१ रामजीपंत
१ विठ्ठलपंत	१ कृष्णजीपंत
१ बगोपंत	१ कोंडाजीपंत
१ विठ्ठलपंत	१ मुधाजीपंत
१ नारोपंत	१ लखमाजीपंत
१ रुद्राजीपंत	१ मुधाजीपंत
१ भिवाजीपंत	१ बापूजीपंत
१ सखोपंत व खंडोपंत	१ अंताजीपंत व बकाजीपंत
१ रुद्राजीपंत व पांडुरंगपंत	१ आप्पाजीपंत रामचंद्र व मोरोबाकल
१२	१२

येणेप्रमाणे वंशावल सांगितले त्यावरून तुमचा व त्याचा मूळपुरूष अेकच तुमच्या वंशाचे तुम्ही धाकट्याचे वतीचे ''**आप्पाजी रामचंद्र**'' व ''**मोरोबाकल**'' असे केले आहे. याकरितां त्यांस आज्ञा केली की तुम्ही भाऊबंदास मानोन रहा. त्यास ते राजी नव्हते. तेव्हा श्री कृष्णेचे दिव्य नेमून देशमुख व मोकादम यास पाठविले. देशमुखास आज्ञा केली जो देशकुलकर्णी असेल त्याने हत्ती धरून काढणे यावर देशमुखांनी कृष्णे सांन्निध जे तकरीर स्वामीसंन्निध केली व सचीव पंत महादजी शंकर याजवळ लिहून दिली तेच बोलणे भोगवट्यावर नजर ठेऊन मोरोबाकल यास हाती धरिले आणि घेऊन आले. देशराम पंचरात्र नियत वरून त्याणी कतबे घेऊन दिले होते. त्यास मुदतीमध्ये प्रचीत आली. यावर सुद्धां मोरोबाकल राजी नव्हे.

यावरून मौजे पाल येथे श्री सन्निध माद्य शुंद्ध प्रतिपदेस दिव्य करावयाचे ऐसा निर्वाह करून निरोप दिल्हा. मुदतीत तुम्ही हजर झाले. ते हजर न झाले याबद्दल त्यास मसाक करून हुजुर आणिले. याउपरी सरकारातून व सभानायक व गोताचे मते विचार मनास तुम्ही व आप्पाजी रामचंद्र व मोरोबाकल भाऊकीचा त्याचा मूळ पुरूष अेक याकरितां दिव्य करावे. हे शार्स्त्रा नाही. तथापि मोरोबाकल याचे आग्रहावरून व कृष्णेचे दिव्य दिल्हे त्यास दुसरे दिव्य पालीस श्री स्थली नेमिले तेथे मुदतीस हजर न झालेमुळेहि खोटा झाला. तिसरी गोष्ट तुमचे वडिल साधिली. वडिल घर तुमचे ते धाकटे याकरितां स्वामी कृपाळू होऊन ता।। मजकूरचे देशकुलकर्णाचे आप्पाजी रामचंद्र व मोरोबाकल यास करार केला आहे. तुम्ही आपला विभाग भाऊबंद देखील आपले बापभाऊ अनभवतील. या वतनास हकलजमा इमानत हिशेबांत असेल ते बरोबर निम्मे निम्म तुम्ही व ते खाणे. जमानत वडील घराण्याकडे असावी. त्यास आलीकडे आप्पाजी रामचंद्र व मोरोबाकल याचाच भोगवटा पडला आहे. वतन संबंधे वसूल जिल्हेकडे घेणे. लेखनालंकार

५४-१०-५७.

महालकरी पेटा डोणजे, परगणे हवेली, सूजा समान सलासीन मया तेन व अलफे सन १२४७ फसली ताकीद करण्यांत येते की वादी आप्पाजी नारायण न्हेकर देशपांडे त।। मजकूर याजवर देशपांडे पण व गांवकुलकर्णे इनाम वगैरे निम्मे वतनाबद्दल दावा नंबर ३६ सन १८३५ इसवीत रेव्हेन्यू कोर्टात केला. त्याचा इन्सफाची चौकशी साहेब एस्कायर प्रिन्सिपल कलेक्टर, जिल्हा पुणे यांनी ता. १३।११।१८३५ इसवी रोजी हुकुमनामा केला. त्यांत हासील की त।। मजकूरचे देशकुलकर्ण व गांवकुलवर्ण व इनाम व हिशेबांत वादी प्रतिवादी यांचा निम्मा निम हिस्सा बरोबर आहे. परंतु त।। मजकूरापैकी काही गावंपंतसचिव. हे खात आहेत. ते सन १८२७ चा कायदा २९ यांत शेवटी लिहिले होते. जे सर्व गांव सरकार इकब म्हणोन लिहिले आहेत त्यांत इकडून ठराव करणे जरूर नाही. यावरून व कंपनी सरकारचे अंमलांत त।। मजकूरचे गांव आहेत. त्या गांवी निम्मे वतन कुलकर्ण व देशपांडेपण वादी यांचे दाव्याबाबत वादी व प्र वादीनी निमानिम घ्यावयाचे. हुकुमनाम्याचे वेळी आम्हांस प्रतिवादी जनार्दन नारायण नाराज होऊन मुंबई येथे अपील नंबर १०५४ चे केले. त्याचा इन्साफ १८३६ रोजी निवाडा ठरविला. ता. १३।११।१८३५ रोजी कलेक्टर यांनी वादी प्र. वादी याचे नांव निमानिम बरोबर समजून हुकुमनामा हाल केला आहे. त्या हुकुमनाम्याच्या अन्यये प्रतिवादी जनार्दन नारायण न्हेकर देशपांडे यांजकडून आमचे निम्मे वतन येणे. त्याची वाहेवाट आम्हांकडे चालविली पाहिजे. म्हणोन अनाजी नारायण व बाळाजी बाबूराव न्हेकर देशपांडे यांनी रेव्हेन्यू कोर्टात अर्जी केली. निम्मे वतन देशपांडेपण व गांव कुलकर्ण वादी आप्पाजी नारायण व बालाजी बाबूराव न्हेकर देशपांडे यांना द्यावे. तो बितपशील

दुमाला गांव पेठ शिवापूर सुद्धा	खालसात गांव आहेत ते
१ कसबे खेड शहाबाग शेरी सुद्धां	९ मौजे कोंढणपूर
२ पेठ शिवापूर कत मजकूर प ।।	१० मौजे कल्याण
३ मौजे कामथडी	११ मौजे आर्वी
४ मौजे केतकावळे	१२ मौजे रहाटवडे
५ मौजे कुंभोशी	१३ मौजे शिवरे

६ मौजे गाऊडदरा
७ मौजे गोगलवाडी
८ मौजे केळवडे

१४ मौजे कुंबरे
१५ मौजे काबरे
१६ मौजे देवसी

वरील सदरी लिहिलेले पंधरा गांव व सोळावी पेठ येथील ईनाम व इसाफत व देशपांडेपण व गांवकुलकर्ण वगैरे वतनाचे उप्तन्नाची जप्ती प्रतवारी जनार्दन नारायण न्हेकर देशपांडे यांनी प्रिन्सिपाल कलेक्टरसाहेब यांचे हुकुमनाम्यावर सदर दिवाणी अदावतीत अपील केले. त्यावेळेस आप्पाजी व बालाजी बाबूराव यानी अर्जी केल्यावरसुद्धां प्रतिवादी जनार्दन नारायण याने त्यांना जमिन दिली नाही. १४।५।१८३६ सर्व वतन कलेक्टर यांनी जप्त करून पेठ डोणजे येथे सरकारांत भरणा केला. ता. २१।७।१८३६ ला पेठ मजकूर येथे ताकीद दिली. त्यास जप्ती पैकी वादी आप्पाजी नारायण वा बालाजी बाबूराव न्हेकर देशपांडे याचे निम्मे हिश्याची मोकळीक करून पसार केली असत. तरी सक्षरी गांवी देशपांडेपण व गांवकुलकर्णी निम्मा वांटा वादी अप्पाजी नारायण व काळजी बाबूराव वतनाचा उपयोग करतील (बी. ५४-१०-६६)

या पत्राची नकल घेऊन असलपत्र भोगवटीयास परतोन देणे जाणिजे. ता. ६।८।१८३७ इसवी, श्रावण शुद्ध ५ शके १७५९

इनाम कमिशन - ए सही ××× सही ××× अमिलेखाधिकारी
इनाम कमिशनर पुणे लेखागार, पुणे

(१०) पुरवणी जवाब गोपाल आनंद देशपांडे तर्फे खेडेबारेकर, मौजे डोणजे, पेठ मजकूर तालुका हवेली, जिल्हा-पुणे कसबे खेड शिवापूर येथे आमची इनाम जमीन आहे. ह्या जमिनीबद्दल पूर्वी इनाम कमिशनरचे चौकशीत कैफियत दिली आहे. त्या कैफियत बद्दल पुरवणी जबावप्रमाणे व्हीसी खुदावंत ग्रीफीथसाहेब, ऑफिशिएटिंग इनाम कमिशनर याचा हुकुम हरिकृष्ण कारकून याचा रिपोर्ट राजि नंबर २०७७, तारीख १५ माहे मे सन १८५१ इसवीचा आला. पुरवणी जबाब लिहून घेतला तोः -

(१) संपादक आमचे पिढीचा म्हणोन आम्ही जबावांत पूर्वी उत्तर दिले परंतु वंशावलीवरून चौदावे पिढीचा संपादक होत आहे हे खरे आहे. पूर्वी विसरल्याने

तेरावे पिढीचा असे होत आहे असे लिहिले असले तरी संपादक चौदावे पिढीचा होतो.

(२) जनार्दन नारायण हे संपादकाचे वंशज म्हणोन पूर्वी लिहिले असले तर तसे नसून संपादकाचे चुलत्याचे वंशज जनार्दन नारायण होत आहे हे खरे आहे.

(३) आम्ही पूर्वी वंशावल दिली. त्यांतील पुरूषास शेत तीजाई किंवा नकल त्याचा तपशील

१ नारोबा व सखोजी भिकाजी त्यांतील यास तीजाई नकल आहे.

१ धोंडो नारायण यास शेत तीजाई नकल आहे. सायरो रघुनाथ सदरप्रमाणे आप्पाजी व मोरो अंताजी संत तिजाई नकल आहे.

१ गणेश यास सेत तिजाई बायको मात्र आहे व कृष्णाजी यादव यास खेत तीजाई नकल आहे.

१ कासी राम व रामजी मल्हार सेत तीजाई नकल.

१ महादेव बाबाजीराव सेत तीजाई नकल आहे.

१ कृष्णाजी रघुनाथ नकल आहे. सेत तीजाई

१ गंगाराम व कोंडो खंडोराव सेत तीजाई नकल खंडेराव मात्र नविमान आहे. येणेप्रमाणे तपशील आहे.

(४) रामचंद्र सखाराम हे इसम ईकडे रहात नसोन माहिमानगडाकडे ता सातारा इकडे रहातात. शेकडो वर्षे तिकडे असल्यामुळे त्यास सेत तीजाई किंवा त्याचे नकल व कायम हे काही ठाऊक नाही. माहिती नाही.

(५) जनार्दन नारायण यांचे वंशाचे

१ दाजी यास सेत तीजाई नकल आहे.

१ धोंडो आप्पाजी व काशिनाथ रामचंद्र यास

(६) निळो नारायण यांचे शेजारी कायम म्हणोन जे हिस्सा दाखल केले तो हरी मोरोपंत याचा मुलगा म्हणजे निको नारायण याचा सख्खा भाऊबंद पाहिजे.

(७) कैफियती बरोबर दोन कागद पुराव्यास दिले ते कोणतेहि खूण समजल्या शिवाय आहे किंवा नाही हे समजत नाही. (बी ५४-१०-६९)

येणेप्रमाणे पुरवणी नंबर कलमावर पत्र ता ३।३।१८५८

१ सखाराम आनंद देशमुख ता।। कर्यातमावल सही ××× गोपाळ अनंत न्हेकर देशपांडे

१ गोंविद विसाजी कारकून तर्फे खेडेबारे दस्तुर खुद.

आम्ही गोपाळ अनंत लिहून देतो की खाली हुकुमात लिहून आलेला कागद राजा शाहू छत्रपती याचे पत्र शके ४९ फसल सन ७ चे व ताकीद ता. ६।४।१४३१

असे हे कागद आम्हांस परत मिळाले आहेत. ते त्याजवर सीक्के व इंग्रजी नंबर याप्रमाणे होऊन मिळाले आहेत हे लिहून दिल्हे सही ता. १९।३।१८५८ इसवी दप्तरी हरी पांडुरंग जमादार सही ×××

सा. स १ सखाराम अनंत कुंजीर पेठ डोणजे

१ वामनाजी दिनकर कारकून

(११) कते खेड शिवापूर ता।। खेडेबारे पेठ, डोणजे ता हवेली जिल्हा पुणे (बी ५४-१०-८४) इनाम कमिशन ए शिक्का पुणे महाराष्ट्र शासन.

जामीन कदीम	नंबर	अेकर	ज्याचे नांव दाखल होते ते नाव	सरकारास द्यावयांचे दरसाल
महातकरी पेठ डोणजे, तालुका हवेली जिल्हा पुणे यांजकडून रिपोर्ट नंबर २२१ ता. २९।८।१८५२ इसवी बरोबर नक्त आला. त्या जमिन टके २ लिहिली आहे त्याप्रमाणे		५८१०८२ खुद्द रामचंद्र गोपाळ	रामचंद्र गोपाळ देशपांडे, न्हेकर वहिवाटदार	०

सदहूर वहिवाटदार रामचंद्र गोपालपंत रिपोर्ट हजर यासी कैफिसत घेणे ती सा ता।। १६ नोंव्हेंबर सन १८५२ ईसवी

इसब मजकूर खुद आज पेशजी हजर होऊन त्याचे सबरी होणे आहेत. खाली लिहिल्याप्रमाणे:-

१ आमचे नांव रामचंद्रपंत बापाचे नांव गोपाळपंत उपनोम न्हेकर जात देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण कसबा कुलकर्णाचे, उमर वर्षे अंदाजे ६०

२ आमचा जन्म कते खेड शिवापूर, पेठ डोणजे, तालुका हवेली जिल्हा पुणे येथे झाला. मूळ वतन शिवापूर रहाण्याची जागा कते मजकूर व जिल्हे पुणे (बी ५४-१०-८५)

३ कते खेड शिवापूर येथे कदीम मापाप्रमाणे दोन बिधे ईनाम जामिन चालत आली आहे.

४ सदहूर जमीन सर्व इनाम वंशपरंपरा चालण्याची आहे. त्याजबद्दल सावकारास पट्टी वगैरे काही आवयाची नाही.

५ सदहूर जामीन बागायत आहे. वतनाप्रमाणे इनाम मिळाली त्याप्रमाणेच आहे.

६ सदहूर जमिन सरकारी खालसातून माधवराव बल्लाळ प्रधान यांनी इनाम करून दिली.

७ सदहूर जमिन शके १६८९ (इ स १७६७) म्हणजे सन ११७७ फसली इनाम मिळाली.

८ सदहूर जमिनीचा मूळ संपादक कांसी रामचंद्र आज त्याचे नांव अंताजीपंत.

९ सदहूर जमीन पेशवे सरकारची आमचे पणज्यांनी कुटुंब पोषणार्थ इनाम मिळविली

१० सन १२२१ फसली साली सदर जमिनीची वहिवाट मीच करीत असून

११ जमीन जप्ती न होतां चालत आलेली आहे.

१२ कंपनी सरकारच्या अंमलापासून जमिनीस जप्ती कधी झाली नाही.

१३ सदहूर जामिनीस पोट इनामाने अद्याप दिली नाही.

(बी ५४-१०-८७)

१४ जमीन लावणीस दुसरे रयतेस अर्धेलीने देत आहो दरसाल त्याचे उत्पन्न देत आहे त्याचा तपशील:-

जमा

२० जमिनीची लागवड ० सरकारांत काही खर्च नाही

<u>०</u> लग <u>२०</u> हमी अैन जमाखर्चाचा रहात असे तर्फे

२०   २०

येणेप्रमाणे वीसाचे अैन जमाखर्च आम्हांस रहात आहे.

३ माधवराव बल्लाळ प्रधान यांनी शके १६८९ (इ.स.१७६७) म्हणजे सन ११२४ फसली सूजा समान सतिन मया व अलफे छ २१ राबेलावलच्या अस्सल

१ कासीरामचंद्र यास अेक सन

१ देशमुख देशपांडे त।। खेडेबारे यांचे मांपाची ताकीद अेक

१ मोकादम कते खेड शिवापूर याचे नावांची ताकीद अके

३

जिवाजी कमाविसदार कते शिवापूर व शहाबाग हे कागद शेरी यांनी शिवराम रघुनाथ त।। सिंहगड पंतप्रधान याणी सूजा सभेत मया व अलफे छ-२१ रबिलावल कासी रामचंद्र याचे नावे अस्सल

येणेप्रमाणे चार कागद इजर केले आहेत. यासी हे कागद आमचेपाशी नाहीत. व साक्षी पुरावा काही होणे नाही व अर्ज शिवापूर व त।। तेथे लिहिली आहे. परंतु आम्हास जमीन मिळल्यापासून आमचे वाहिवाटीस दोन बिघेपड आहे व सदरहू हुकुमाप्रमाणे गावाचे हिशोबास हिस्सा पडत आहे. मग सदर सरकारी हिशोबांत काय कारणाने दोन टक्के खंड पडत आहे ते आम्हास माहित नाही.

येणेप्रमाणे आमचे जबाजबाब वगैरे छत्रपति संबंधे हाजीर अशी इनाम कमिशनर याचे समीर लिहून आम्हांस परत केला. ता १६।११।१८५२ मुक्काम पुणे

सही ××× रामचंद्र गोपाळ न्हेकर ता खेडेबारे द खुद तुम्ही सदरी पंधरावे कलमांतील जबांबांत चार कागद पुराव्यास हजर केलेत ते तुम्हांस परत दिले आहेत. पाठविल्यावर जबाबी घेणे. इनाम कमिशन-ए ५४-१०-९०

जबाब

आम्ही पुराव्यास दिलेले अस्सल आम्हांस दिले ते पावले

सही ××× इनाम कमिशनर सही ×××; पुणे पुरालेखागार; सही रामचंद्र गोपाळ न्हेकर देशपांडे पुणे, ता. खेडेबारे खुद.

सही ××× अभिलेखाधिकारी

पुणे पुरा लेखागार पुणे

(१३) वंशावल रामचंद्र गोपाळ न्हेकर वस्ती, खेड शिवापूर, पेठ-डोणजे, तालुका हवेली, जिल्हा पुणे कसबे मजकूर येथील दोन बिघे इनाम जमिनीबद्दल कैफियत लिहून घेऊन याजबरोबर ही वंशावळ संपादक आल्यापासून लिहून दिली असे. ता १९।११।१८५२ ईसवी सही ××× शिक्का पुणे पुरालेखागए सही ××× सही ××× रामचंद्र गोपाळ न्हेकर देशपांडे इनाम कमिशनर पुणे महाराष्ट्र शासन वंशावल पुढील पानावर पहा.

(१४) श्री नक्कल

(बी ५४-१०-९६)

मा........ देशमुख व देशपांडे त।। खेडेबारे यास माधवराव बल्लाळ प्रधान सुहुरसन समान सीतेन मया व अलफे शके १६८९ सर्वजिम नाम संवत्सरे राजमान्य कासी रामचंद्र उपनाम न्हेकर, गोत्र, अत्रि, सूत्र आश्वलायन याणी हुजुर कसबे पुणे येथील मुक्कामी येऊन विनंती केली की आपण कुटुंब वत्सल योगक्षैम चालला पाहिजे यास्तव स्वामीनी कृपाळू होऊन यास चालवणे आवश्यक जाणून याजवर कृपाळू होऊन काही नूतन जमीन पाटस्थळ इनाम करार करून घेऊन चालविली पाहिजे. म्हणून त्याजवरून हे कुटुंबवत्सल याचे चालवणे आवश्यक जाणून त्याजवर कृपाळू होऊन यास कते शिवापूर पे।। जमीन पाटस्थळ अव्वल बिघे दोन दरोबस्त कुलबाब कुलकानू हल्ली पटी व पेस्तरपटी व जल तरू तृष्ण काष्ठ पाषाण निधि निक्षेपादी साहित खेरीज हकदार करार करून घेऊन हे आज्ञापत्र सादर केले असे तरी कते मजकूर प्र ।। सदरहू प्र।। जमीन पाटस्थळ दोन बिघे चतु:सीमापूर्वक याचे दुमाला करून घेऊन यास व याचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेने ईनाम चालविणे. दरसाल ताजे पत्राचा उजूर न करणे या पत्राची प्रति लेहून घेऊन हे अस्सल पत्र भोगवटीयास मजकूर जिल्हेजवळ परतोन देणे जाणीजे. छ-२१ रबिलावल आज्ञाप्रमाण लेखन सीमा इनाम ए कमिशन

(बी ५४-१०-९८)

१५ श्री नकल (बी ५४-१०-९९)

राजश्री कासी रामचंद्र उपनाम न्हेकर, गोत्र, -अत्रि, सूत्र आश्वलायन गोसावी सेवक माधवराव बल्लाळ प्रधान नमस्कार सूमा समान सीतेन मया व अलफ शके १६८९ सार्वजित नाम संवत्सरे तुम्ही हुजुर कसबे पुणे मुक्कामी येऊन विनंती केली की आपल कुटुंब वत्सल योग चालविला पाहिजे. यावर स्वामीनी कृपाळू होऊन कांही नूतन जमीन पाटस्थळ इनाम करार करून घेऊन चालविला पाहिजे म्हणोन त्याजवरून मनास आणून तुम्ही कुटुंबवत्सल तुमचे चालविणे आवश्यक जाणून व तुम्हांस कृपाळू होऊन कसबे शिवापूर ता। खेड बारेपैकी जमीन पाटस्थळ बिघे दोन दरोबस्त पटी न पेस्तरपटी जल, तरू, तृण, काष्ठ, पाषाण, निधी नि संपादी सहीत खेरीज हकदार करून नूतन ईनाम सरकारातून करार करून दिल्हा असे. तरी कते मजकूरपैकी जमीन सदरहू प्रमाणे दोन बिघे चतु:सीमापूर्वक आपले दुमाला करून घेऊन तुम्ही वडिलांचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेने ईनाम अनुभवून सुखरूप रहाणे जाणिजे. छ-२१ रबिलावल

आज्ञाप्रमाण लेखन सीमा सुरू खुदू (बी ५४-१०-१०१)

आज्ञापत्र धुरंधर विद्यासंभिधी राजमान्य राजश्री माधवराव बल्लाळ पंडित प्रधान त।। मोकादम कसबे शिवापूर त।। खेडेबारे, सूमा सीतेन मया व अलफे, शके १६८९ (इ.स.१७६७) सर्व जित नाम संवत्सरे, राजश्री कासी रामचंद्र उपनाम न्हेकर, गोत्र, -आत्रि, सूत्र आश्वलायन,

याणी हुजुर कसबे पुणे येथील मुक्कामी येऊन विनंती केली की आपण कुटुंबवत्सल योगक्षेम चालला पाहिजे. यास्तव स्वामीनी कृपाळू होऊन काही नूतन जमीन पाटस्थळ ईनाम करार घेऊन चालविली पाहिजे. म्हणून आजवरून हे कुटुंबवत्सल याचे चालविणे आवश्यक जाणून त्याजवरी कृपाळू होऊन कते मजकूरपैकी जमीन पाटस्थळ अव्वल बिघे दोन, ८ दरोबस्त कुलबाब कुलकानू हल्ली पटी व पेस्तर पठी जल, तरू, तृण, काष्ठ, पाषाण, निधी निक्षेपार्दसहित खेरीज हकदार करून नूतन इनाम करार करून घेऊन हे कागद सादर केले

असे. तरी कते मजकूरांपैकी सदरहूप्रमाणे व याचे सनदेची नक्कल लेहून घेऊन हे अस्सल सनद याजवर भोगवटी यास परतोन देणे जाणिजे. छ-२१ रबिलावल आज्ञाप्रमाण लेखन सीमा (बी-५४-१०-१०३)

शिक्का, पुणे पुरालेखागार, पुणे, महाराष्ट्र शासन सही ××× सुरूं सुद अभिलेखाधिकारी, पु. पु. पु

(१७) इनाम कमिशन-ए "श्री" नकल (बी-५४-१०-१०४)

रा. रा कासी रामचंद्र नऱ्हेकर, गोत्र अत्रि सूत्र आश्वलायन स्वामीचे सेवेसी सेवक हरजी जिवाजी कागद कसबे शिवापूर व शहाबाग शेरी यांचा त।। सिंहगड राजश्री .... प्रधान यांना नमस्कार श्रीमंत राजश्री .... पंत प्र।। मांसी तुम्ही विनंती करून आज्ञापत्र आणले व तेथे आज्ञा की आपणास इनाम पाटस्थळी जमीन अव्वल बिघे रीत चतुःसीमापूर्वक लिहून देणे. तर सरकारची आंबराईची झाडे लागली आहेत. त्यांतील जमिन घेता कामा नये. कसबे खेडेबारे येथील पाटस्थळीपैकी जमीन घ्यावी. तर वतनदार देशमुख यांजकडे पूर्वीपासून चालत आला आहे. मळईच्या जामिनी मोजून जमिन द्यावी. (बी-५४-१०-१०५)

अर्ज काढ्या १४।। आंब्यापाशी पूर्व पश्चिम उत्तरेस, कुल कावा दक्षिणोत्तर ३१

२४ मध्यभागी

२४ शेवटी दक्षिणेस

६१।। पैकी तिजाई २०।।. ७९९।।.

अेकूण जमीन बिघे दोन दिल्ही आहे. यांसी चतुः सीमा पूर्वेस कते मजकूरची ओढा व पश्चिमेस कच्चा धरणाचा पाट उत्तरेस उंबर व आंबा व दक्षिणेस उंबर व हद्दीचे दगड रोविले आहेत. येणेप्रमाणे चतुःसीमा करून दिल्ही असे. सदहूर जमिनीस पाटाचे पाणी चालीप्रमाणे पावले. सदरहू जामीन तुम्ही व तुमचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेने आनभवून सुखरूप रहाणे. छ ११ रजविन. सुहुरसन रूमान सीतेन मया व अलफे बहुत काय लिहिणे मोर्तब सूद (बी-५४-१०-१०६)

इनाम कमिशन ए सुरू सुदू
सही ××× अभिलेखाधिकारी
पुणे पुरालेखागार, पुणे

(१८) रोजकांर्द .... मयातेन सुमासमान सीतेन मया व अलफे दि १८।११।१८५२ चे हुकुमाप्रमाणे नूतन जमीन बिघे दोन पुत्रपौत्रिक वंशपरंपरेने दिल्ही ब्राह्मणकारणी हुजुर कते पुणे येथील मुक्कामी येऊन विनंती केली की आपण कुटुंबवत्सल योगक्षेम चालला पाहिजे. यास्तव स्वामीनी कृपाळू होऊन बिघे दोन यासी रामचंद्र = हेकर ता।। खेडेबारे प्रो जमीन पाटस्थळ असलेली दिली (बी ५४-१०-१०८ व १०९)

सही ××× अभिलेखाधिकारी पुणे पुरालेखागार

(१९) (बी ५४-१०-११०) ता. १४।५।१८५७

कमिशनर साहेबांचे खिजमतीस -

आज हरिकृष्ण ता १४।५।१८५७, कते शिवापूर, पेठ डोणजे, तालुका हवेली, जिल्हा पुणे

१ गोपाळ आनंद न्हेकर कैफियत दिली त्यातले आठवे जबावंत संपादक आमचे तेरावे पिढिचा म्हटले आहे. वंशवल पहातां तो चौदावे पिढिचा आहे. (बी(५४-१०-१११) आणि संपादकाचे वडिल त्याचा देशस्थ जनार्दन नारायण होत असोन संपादकाचे भावाचा वंश म्हणोन लिहिले त्याबद्दल कलम ८।११ प्रमाणे पुरवणी नांव पाहून कैफियतीस वंशावल हजर केली. त्यांत खाली लिहिले इसमास पुढे सिलमी आहे किंवा नकल याजबद्दल वगैरे पुरवणी जाबजबाब (बी ५४-१०-१११)

१ नारोबा व सखाजी भिकाजी
२ धोंडो नारायण
३ सोयरो रघुनाथ
४ आप्पाजी व मोरो अंताजी
५ गणेश लक्ष्मण व कृष्णाजी यादव
६ काशिनाथ व रामाजी मल्हार
७ महादेव बाबूराव
८ कृष्णाजी रघुनाथ
९ गंगाराम व कान्हे खंडोराव

येणेप्रमाणे हे समस्त पुढे संपती किंवा नकल याजबद्दल व रामचंद्र सखाराम हा कायम किंवा न येत असोन नक्कल मिळाले याचाही जाब घेऊन सदरहू वंशावल

प्रमाणे जनार्दन नारायण आणि आम्ही सदरहू जामिनीची वहिवाट आम्हीच करीन होतो म्हणोन जबाबांत लिहिता. परंतु वंशावली पाहतां आप्पाजी वहिवाट करित होता असे केले आणि सदरहू जमीन सरकारनी परत घेतली किंवा नाही याजवरून कलम ११।११।१४ प्रमाणे पुराव्यांत नांव रहाणेवर कैफियत वंशावल हजर केली. त्यांत आप्पाजी व राधो नारायण यास पुणे संमती किंवा नकल जाली त्याजवरून ठरेल की जबाद घेऊन सरकैफियत घेणार याजी कैफियतीचे पुराव्यास लवकर कागद हजर केले. ते त्यास परत दिल्याची कैफियती खाली जाब आहे. त्याजवरून करतो. परंतु सदर कागदावर सीमे वगैरे घेऊन कागदावर परत मिळाले किंवा याही हे समजत नाही. त्याजबद्दल मुकासा येणेप्रमाणे मजकूर जाहीर केला आहे. ...... सही ××× हरि कृष्णाजी (बी. ५४-१०-११३)

हरी रामचंद्र वलभ १ मध्ये लिहिल्याप्रमाणे पुरवणी नाव कैफियत घेतल्यापासून कसे कोठे आले ते लिहून द्यावे. आणि कलम २ यांत लिहिल्याप्रमाणे पुरवणी जाब घेऊन त्यांत कागद मिळाल्यापासून शिक्के झाले. किंवा कसे ते रिपोर्ट पाठविल्याप्रमाणे ता. १५।५।१८५१

सही ××× इनाम कमिशनर

खुदांवत ग्रिफिथसाहेब-हुजुर

सदरी रघोपंत वादीने कलमांत लिहिले आणि गोपाळ आनंद याचा पुरवणी जबाब घेऊन पाठविला आहे. त्याजवरून हल्ली कसा होइल दोन कागद पुराण्यास कोणते दिले त्याची खूण समजली पाहिजे म्हणजे पाडून पावती घेऊन ठेऊन दिल्हे आहे. कलम-२ यांत लिहिले आहे. रामचंद्र गोपाळ याचाहि पुरवणी जबाब आलेला पाठविता आहे. त्याजवरून कळले कागद चार सीमे होऊन परत मिळाले आहेत. जाहीर व्हावे. पोट कागद पुरवणी जबाब घेतला असत. द.खु हवी पांडुरंग हवेली नंबर ८२९ (बी-५४-१०-११४)

दोन कागद हजर झाले. पैकी कैफियत बरोबर पुरशीस दाखल आहेत. ते अेक राजा शाहु छत्रपती याचे पत्र तपे ४९ फाल्गुन शुद्ध १ चे दुसरे सन १८३१ सालची असे दोन कागद अेकूण ४ कागद कैफियत पूर्ण झाल्यावर सिक्के होऊन परत मिळाले असतील.

सही ××× इनाम कमिशनर उपभाग खुशवंत ग्रीफिथसाहेब बहादूर इनाम कमिशनर याचे हुजुरास अर्ज -

गोपाळ आनंद याने दोन्ही कागद सीमे घेऊन व इंग्रजी नंबर घालून आम्हांस परत केले आहेत. म्हणोन सदर पुरवणी जबाब लिहून दिले आहे. हा जबाब जाहीर हेण्यास हुकुमापोटी कागद २ असेत. ता १९ माहे. मार्च सन १८५८ ईसवी हे अर्ज.

दस्तुर हरी पांडुरंग कास्कून सही ×××

सही ××× अधिलेखाधिकारी पुणे इनाम कमिशनर शिक्का

पुरालेखागार, पुणे. उत्तम भाग

(२०) पुरवणी जबाब रामचंद्र गोपाल नऱ्हेकर देशपांडे राहणार खेड शिवापूर तर्फ खेडेबारे, पेठ-डोणजे, तालीके हवेली, जिल्हा पुणे ....

आमची इनाम जमिन कसबे मजकुरी आहे. त्या जमिनीबाबत पूर्वी इनाम कमिशनरचे चौकशीत कैफियत दिल्ही आहे. त्या कैफियताबद्दल पुरवणी जबाब घेणेविसी खुशावंत ग्रीफिथसाहेब बहदूर इनाम कफिशनर यांचा हुकुम हरिकृष्ण हुजुर कारकून याचे रिपोर्ट खाली. राजे नंबर २०७७ तारीख १५ माहे सन १८५१ ईसवीचा आला. त्याजवरून पुरवणी लिहून देतो की

१ आमची इनाम जमिन बिघे दोन ८ आहे. त्याप्रमाणे कैफियतीचे तिसरे जबाबांत लिहून दिले. बिघे असा दाखल आहे. कैफियतीचे कागदांत टक्के दोन असे लागले असले तरी आमची जमीन दोनच बिघे आहे. त्यावर टक्के कसे लागले हे ठाऊक नाही.


२ माजी अंमल दूर होऊन अस्सल इंग्रजीस संपादकाचे भाऊ म्हणजे आमचे बाप गोपाळ रामचंद्र हेच वहिवाटदार सदहूर जमिनीची लागवड करीत होते हे खरे पूर्वी जबाबांत अव्वल इंग्रजीत वहिवाट करित होते असे हुकुम दिले असल्यास ते चुकले आहे बाप गोपाळ रामचंद्र हे अस्सल हे वहिवाट करित होते ते शके १७६६ साठी माधमासी मयत झाले आहेत. ते मयत झाल्यापाठीमागे मी त्याचा वारस पुत्र आनंद व सर्व मालकी माझी सबब मी सदरहू जमिनीची वहिवाट करीत आहे. सरकार परवानगी वगैरे झालेली नाही.

१ सदरहू इनामपट्टी आम्ही कां ही कोणास पोट इनाम वगैरे दिल्ही नाही व सरकारनेही काही कधी परत घेतली नाही. मिळालयाप्रमाणे दोन बिघे आमची आम्हांकडे जमिन चालत आहे.

१ सदरहू कैफियती बरोबर वंशावल पूर्वी दिली. त्यांत दाजी आप्पाजी व रंगो नारायण लिहिले. त्याजला पुढे संतती नाही. नकल होण्याचेहि जाले आहे. पुराव्याचे उत्तर कागद सिके घेऊन परत दिले आहेत. सही ××× १६।७।१८५८. द.खु हरी पांडुरंग ..... कारकून

साक्ष	सही ×××
१ गणेश अंताजीपंत	रामचंद्र गोपाळ नऱ्हेकर देशपांडे र.खु.
२ वामन हरी साहले	ता।। खेडेबारे

वंशावळ गोपाळ आनंद नऱ्हेकर देशपांडे व इतर
तर्फ खेडेबारे, वस्ती - खेड-शिवापुर, पेठ डोणजे, तालुका - हवेली, जिल्हा- पुणे, इनाम जमिनीबद्दल कैफियत




सही * * *
गोपाळ आनंद नऱ्हेकर देशपांडे

सही * * *
त्रिंबक बल्लाळ उर्फ नऱ्हेकर देशपांडे

दिनांक १९ - ११ - १८५२

* खेड शिवापूर येथील
इनाम जमिनीचा मूळ संपादक

खेड - शिवापूर येथील नऱ्हेकर देशपांडे, इनाम जमिनीबद्दल-



ग्रामपंचायत नमुना ८ उतारा (नक्कल)

बुक नं १, पान ४३

असलेल्या इमारती व जमिनी यांची २००१/२००२ साली बद्दलची आकारणी यावी

ग्रामपंचायत - वडगांव : तालुका - मवाळ, जिल्हा - पुणे येथील ग्रामपंचायत

ग्रामपंचायत शिक्का

अ. नं.	रस्त्याचे नाव	मिळकत नंबर	मिळकतीचे वर्णन	मालकाचे नाव	भोगवटा करणाऱ्याचे नाव	इमारतीचे क्षेत्र. चौ. फुटांमध्ये
१	२	३	४	५	६	
१११		१५८	घुमट बोळ	ग्रा. पं.	खुद्द	-

घरपट्टी	आरोग्य कर	वीज कर	पाणी पट्टी	एकूण कर	आपेलाचे निकाल	शेरे व दुरुस्त्या	शेरा
७	८	९	१०	११	१२ ते १७	१८	१९
-	-	-	-	-	-	-	-

नक्कल फी - येणेप्रमाणे अस्सलबर हुकूम नक्कल अर्जदार

अक्षरी रु. - श्री. राजाराम शंकर देशपांडे यांचे अर्जावरून उतारा तयार केला असे.

सही

मिळाली ता.

२९/०५/२००८ ग्रा. पं. वडगांव
मावळ, जि. पुणे
सही

ग्रामविकास अधिकारी
वडगांव मावळ, जि. पुणे

नारो बाजूजी मुद्गल, न्हेकर देशपांडे (नांदोशीकर) यांची समाधि पुणे मुंबई रस्त्यावर, पुण्यापासून ३१ किमी. अंतरावर, वडगांव - मावळ, तालुका -मावळ, जिल्हा - पुणे मार्गावर असून गांवठाणांतच जुन्या मुंबई रस्त्यावर, चिंतामणी चिंचेचा गणपती इस्ट समोरील बोळांत गिरीराज प्रो. स्टोअर्स लागून आहे.

वडगाव - मावळ येथील मिळकत क्रमांक १५८, घुमट बोळ संबोधिलेली, वडाच्या झाडाखाली पक्की समाधी असून ती ग्रामपंचायतीचे ताब्यात आहे. चिरेबंद दगडांत चौकोनी अंदाजे ८' × ८' असून झाडांच्या मुळ्या आंतमध्ये शिरल्या अवस्थेत असून दुखस्थेत आहे.

सुरतेची लूट (पहिली) शके १५८५, शुक्रवार दि. ५/२/१६६३ रोजी चिमणाजी, परसोजी, संताजी हे नेताजीसह लूट घेऊन येताना मोगल सरदार मुकूंदसिंग राजपूत याजबरोबर झालेल्या धुमचक्रीत नारो बापूजी बाण लागून घोड्यावरून खाली पडले. (पुरंदरा भाग ३; पृष्ठ १३८, श. शि. विजय देशमुख पृष्ठ १००९) (कृपया फोटो पृ... पहावा)

मुद्गल न्हेकर नांदोशीकर देशपांडे घराण्यांतील पोलीस - मुलकी पाटील हिशेबान्तर्गत जमा वसूल

उतारा सन १२३६ फसली सालचे चिठ्यास खंडो मोरश्वर मोकासी नांदोसी कर याजबदल सेरा आहे त्याचा मौजे नांदोसी तर्फ कर्यात मावळ पेट डोणजे सन १२९८ फसली बाकी खंडणीची बेरीज काळीचा आकार ४९९८ ≡।। रु. पैकी मोकासा अंमल खंडो मोरेश्वर यांजकडे सरंजाम मोकासा आम आहे तो नेमणूक रुपये १२८ सदरहू येकसे आठ्ठावीस रुपये काली पौ गुदस्तवर हुकुम खर्च व्याहावयाचा परंतु सालमजकुरी खंडो मोरेश्वर मोकासी नांदोसीकर हे मयत जाले. ते मिती श्रावण शु।। शके १७४८ व्ययनाम संवत्सरे तारीख ४ माहे ऑगष्ट सन १८२६ इसवीस मृत्यु पावले. सबब सरंजामी अंमल यामुळे खर्च कमी लिहिला ते व।। गुदस्त प्रमाणे रुपये १२८

बाकविसुली स्त्रो ४९९८ ≡ ।।

असलबर हुकुम सेऱ्याचा उतारा

रुजू पाहणार हरी पांडुरंग कारकून जमीदार पेटामजकूर

लक्ष्मण बळवंत

रामचंद्र काशिनाथ अ।। मामालेदार.

